

## [ १२ ] : आरती करू सदगुरूंची सिद्ध योगेश्वर बाबांची :

आरती करू सदगुरूंची । सिद्ध योगेश्वर बाबांची
अलौकिक दिव्य देहकांती । सदोदीत हास्यवदन असती
स्वरूपी उन्मनी असती। साइपरी जगात वावरती
वागणे साधे असे ज्यांचे
करीती कल्याण भक्तांचे
पुजारी पहा हे शक्तीचे
अज्ञ जनाना , उद्धरण्याला , योगी पहा हा उभा राहीला ।।
कार्य करीत जगती। करू या बाबांची आरती।। १ ।।

बसती सिद्धासन घालुन। दृष्टीला भृकुटी लावुन
जागृत करूनी कुंडलिनी।तल्लीन होती शिवध्यानी
शिवस्वरूप पहा यांचे
संकटे निवारी भक्तांचे
स्थांन हे अढळ श्रध्देचे
शिवापरी हो शक्ती यांची , मुक्त हस्ते वाटुन देती
जगास उद्धरती। करू या बाबांची आरती।। २ ।।

पार्वती असे आदी माया।गीताईची तशीच असे किमया
प्रकृती पुरूषापरी असे हा संसार। चालविती सिद्ध योगेश्वर
मुंबापुरी भेट झाली
प्रेमे लोटांगण घाली
माउली कृपावंत झाली
नीत्य तुझ्या मी जवळी आहे , बोल बोलती , अभय देती
पंरपराही सदगुरू गुळवणींची।करू या बाबांची आरती।। ३ ।।